◆धामणगाव रेल्वे ◆ गुरुवार 11 जुन 2026 ◆वर्ष-10 वे ◆अंक- ◆पृष्ठ-४ ◆किंमत-४
RNI Regn no.- MAHBIL/2013/54875 Post Regd.No.-ATI/RNP/3337/2025-2027

सोशल मिडीया Edition

साप्ताहिक
# नव प्रहार
भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

सोशल मिडीया Edition

मुख्य संपादक:-संजय पांडे मो.८५५२९५८५५५ navprahar2013@rediffmail.com

# पंचायत समिती आवारातील एकात्मिक बाल विकास कार्यालयाला लागलेल्या आगीची सी.आय.डी चौकशी करा!

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून मागणी

**नांदगाव खंडेश्वर / तालुका प्रतिनिधी**

नांदगाव खंडेश्वर पंचायत समिती आवारातील एकात्मिक बाल विकास कार्यालय ढ्ढष्टष्ठस् 8 जून रोजी दुपारी 2 वा. येथे भीषण आग लागली. आगीत लाडकी बहीण, लेक लाडकी योजनांचे हजारो अर्ज, पोषण आहार, बेबी किट्स व अंगणवाडी सेविकांच्या नोंदवह्या जळून खाक झाले कार्यालयामार्फत विविध योजनेतील अर्ज सुद्धा जळाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.



संशयास्पद बाब म्हणजे आगीच्या 2 दिवस आधीच कार्यालयाचा वीजपुरवठा बंद होता. शॉर्टसर्किटशिवाय आग लागली कशी ? आर्थिक घोटाळा लपविण्यासाठी आग लावली का, असा संशय. माकप च्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आला. मा विभागीय आयुक्त साहेब, मा. मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, यांना सुद्धा निवेदन देण्यात आले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉ. शाम शिंदे यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन देऊन प्रकरण CID कडे वर्ग करून दोषींवर कारवाईची मागणी केली. जळालेल्या कागदपत्रांमुळे कोणत्याही लाभार्थीला योजनेचा लाभ नाकारू नये, अशी लेखी हमीही मागितली. प्रशासनाने दखल न घेतल्यास जनतेची एकजूट करून दिलेल्या निवेदनातुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष नांदगाव खंडेश्वर तालुका सचिव कॉ. शाम शिंदे, माकप राज्य कमिटी सदस्य कॉ. सुभाष पांडे, माकप शहर सचिव मोहसीन शेख, दिलीप महल्ले, अशोक केसरखाने, शहेनशहा, शैलेश कटाने, किशोर शिंदे या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी निवेदन दिले.

**CPM ची मागणी काय?**

कॉ. शाम शिंदे यांनी दिलेल्या निवेदनात ठळक मागण्या केल्या आहेत-

1) घटनेपूर्वी 2 दिवस आधीच कार्यालयातील विद्युत मीटर काढून वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. मग शॉर्टसर्किटमुळे आग लागली कशी ?

2) प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यासाठी संपूर्ण फाईल CID कडे वर्ग करावी

3). दोषी आढळल्यास कठोर फौजदारी कारवाई करावी

4) जळालेल्या कागदपत्रांमुळे कोणत्याही लाभार्थी महिलेला/मुलाला योजनेचा लाभ नाकारू नये याची लेखी हमी प्रशासनाने द्यावी

5 ) स्थानिक पोलीस व अग्निशमन विभागाची प्राथमिक चौकशी पुरेशी नाही.

## घाटंजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे भव्य रोजगार मेळावा



**घाटंजी** – सचिन कर्णेवार दिनांक 9/6/2026 रोजी वर्गीस कुरियन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था घाटंजी जिल्हा यवतमाळ येथे अप्रेंटिस तसेच रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.त्यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील कंपनी (Eagle Hi-Tech Industrial Corporate Pvt .Ltd.)

संभाजीनगर येते की, संस्थेचे त्यावेळी प्रशिक्षणार्थी यांना रोजगार मिळावा आणि त्यांचे आर्थिक सुलभता साध्य करता यावी तसेच त्यांना कंपनीमध्ये रोजगाराची संधी मिळावी ह्या उद्देशाने शासकीय आय.टी. आय.संस्थाचा वतीने TCPO एस.एन.आसोले यांचेशी फोन वरून संपर्क करून दिनांक9/6/2026 रोजी सकाळी 11ः15 अप्रेंटिस तथा भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.ट्रेडची मधे विजतंत्री ,copa, wire-man,जोडारी, वेल्डर आयसीटी एसएम.इत्यादी कामाबाबत संधी..आणि Surveyar मोटर मेकॅनिक वेहिकल या व्यवसायातील साधारणता 160 प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. त्यामधील 65 मुलांची निवड झाली असून त्यांना आय टी आय चां वतीने egle Hi Tech prvt LMT कंपनी मधे संस्थेत रोजगार निचीत झाला. या कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी प्रभारी गट निर्देशक एस.एन.असोले प्रमुख मार्गदर्शक संभाजीनगर येथील संस्थेचे एच.आर.सुधीर आवटे,त्यांचे सहकारी राठोड उपस्थिती होते. तर सदर कार्यक्रमाचे संचालन शिल्प निदेशक भाविक भगत यांनी केले.तर आभार सूरज शेवतकर यांनी मानले.

# जनतेच्या प्रश्नांसाठी गेलेल्या शिष्टमंडळावर नगराध्यक्षा भडकल्या

**अतिक्रमण कारवाईवरून यवतमाळ नगराध्यक्षा आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक!**



**यवतमाळ /प्रतिनिधी**

यवतमाळ शहरातील अतिक्रमण हटाव कारवाईत दुजाभाव होत असल्याचा आरोप करत शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांची भेट घेतली.मात्र ही भेट वादग्रस्त ठरली.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार,नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाला नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी 'माझ्या केबिनमध्ये येण्याचा अधिकार तुम्हाला कुणी दिला?' असा सवाल केला.यावर प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख यांनी 'ही जनतेची खुर्ची आहे,जनतेचे प्रश्न घेऊन आलेल्यांना असा प्रश्न विचारू नये,' असे प्रत्युत्तर दिले.यावेळी दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक चकमक झाली.या घटनेमुळे अतिक्रमण हटाव मोहिमेतील कथित दुजाभावाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

यावेळी गटनेत्या वैशाली सवाई,कृष्णा पुसनाके,नंदू कुडमेथे,सुनील बोरकर,किशोर बडे,अनुप नैताम,साधना शंभरकर,रवी शंभरकर,अत्तर सिंग चव्हाण,असमत खान,जावेद अख्तर,राजेंद्र गौतम पाटील,विक्की राऊत,वृषभ गुल्हाने,ओम तिवारी,विशाल पावडे,तन्वीर शाह,छोटू सवाई,गिरीश खंदेडिया,नईम पैलवान,पडाळे सर,प्रा.पंढरी पाठे तसेच अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# मान्सूनची प्रतीक्षा वाढली, विदर्भ 44 डिग्री च्या ज्वाळांत!



**नागपूर**– महाराष्ट्रासह देशाच्या काही भागात मान्सूनच्या आनंदसरी बरसल्या असताना विदर्भ मात्र उष्णतेच्या लाटेने होरपळतो आहे. तापमानाने पुन्हा उसळी घेतली असून अनेक शहरात कमाल तापमान सरासरीपेक्षा 4 ते 6 अंशापर्यंत वाढले आहे. नागपूर, वर्धा आणि ब्रम्हपुरीचा पारा 44 अंशाच्या पार गेला आहे. हवामान विभागाने पुढचे 24 तास उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.गुरुवारी नागपूरचा पारा अंशतः वाढून 44 अंशावर पोहचला, जो सरासरीपेक्षा 4.3 अंशाने अधिक आहे. ब्रम्हपुरीचे तापमान 1.3 अंशाने घसरले असले तरी 44.2 अंशाची नोंद झाली, जी 4.9 अंशाने अधिक आहे. दुसरीकडे वर्ध्याचे तापमान अंशतः वाढून 44.5 अंशावर पोहचले आहे, जे राज्यात सर्वाधिक आहे. वर्ध्याचे तापमान सरासरीपेक्षा तब्बल 6 अंशाने अधिक आहे. पश्चिम विदर्भात अमरावतीचे तापमान 42.8 अंश असून सरासरीपेक्षा 6 अंशाने अधिक आहे, तर 43.4 अंशावर असलेला अकोला सरासरीपेक्षा 4.8 अंशाने अधिक आहे. 43.2 अंशावर असलेले यवतमाळ 5.7 आणि बुलढाणासुद्धा 5.5 अंशाने अधिक आहे.




# नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील रस्त्यांची विकासकामे रखडली

**भूमिपूजनानंतरही अनेक कामांना सुरुवातच नाही**

**पावसाळा तोंडावर पण कामाचा पत्ता नाही**

**नांदगाव खंडेश्वर / उत्तम ब्राह्मणवाडे**

केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजूर झालेल्या अंजनगाव बारीङ्कअडगाव (बु.)ङ्कमांजरी म्हसलाङ्कसातरगाव या महत्त्वाच्या मार्गाच्या सुधारणा कामाचे भव्य भूमिपूजन 1 मार्च 2026 रोजी सातरगाव येथे संपन्न झाले होते. सुमारे 22 कोटी 60 लाख 74 हजार रुपये खर्चाच्या या रस्ते प्रकल्पासह तालुक्यातील विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. मात्र तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही अनेक कामांना प्रत्यक्ष सुरुवात झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे.



त्या दिवशी महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते व आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले होते. अडगाव (बु.) येथे प्रवासी निवारा व सिमेंट काँक्रीट रस्ता, मांजरी म्हसला येथे सभागृह, एरंडगाव-मांजरी म्हसला डांबरी रस्ता, कंझरा-नांदगाव मार्ग, सावनेर येथील अण्णाभाऊ साठे सभागृह व रस्ता, खिरसाना येथील आरोग्य केंद्र कंपाउंड वॉल तसेच जळू येथील बौद्ध विहार अशा विविध विकासकामांची घोषणा करण्यात आली होती.

यामध्ये सर्वाधिक महत्त्वाचा मानला जाणारा अंजनगाव बारी-अडगाव (बु.)- मांजरी म्हसला- सातरगाव रस्ता हा परिसरातील अनेक गावांना जोडणारा प्रमुख मार्ग आहे. या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय असून नागरिकांना दररोज खड्डे, धूळ व वाहतुकीच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भूमिपूजनावेळी लवकरच काम सुरू होईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र अद्याप प्रत्यक्ष कामाला गती मिळालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या मते, विकासकामांचे भूमिपूजन करून केवळ श्रेय घेण्यापेक्षा संबंधित यंत्रणांनी कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. मंजूर निधी असूनही कामे रखडल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला खीळ बसत आहे. त्यामुळे प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून सर्व विकासकामे तातडीने सुरू करावीत,अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



# कर्जमाफी शासन आदेशाची होळी करत किसान सभेने राज्य सरकारचा केला धिक्कार!

## नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने



**नांदगाव खंडेश्वर /तालुका प्रतिनिधी**

दिनांक 11 जून 2026 महाराष्ट्रभर किसान सभेच्या वतीने कर्जमाफी शासन निर्णय विरोधात शेतकऱ्यांची एकजूट करून राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली होती त्याचाच भाग म्हणून नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयावर किसान सभेच्या वतीने शासन निर्णयाची होळी करून तीव्र आंदोलन करण्यात आले. मा. तहसीलदार अश्विनी जाधव यांचे मार्फत मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले की, कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या वेळची कर्जमाफी आज पर्यंतच्या सर्व कर्जमाफ्यांमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी किसान सभेने या आदेशाची राज्यभर होळी करण्याची हाक दिली होती.

सरकारने कर्जमाफी करताना, 2019 मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ 50 हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता 2 लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ 50 हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे . शेतकऱ्यांची घोर फसवणूक आहे आहे असे आरोप यावेळी बोलतांना किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ.शाम शिंदे यांनी व्यक्त केले.

नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालय येथे झालेल्या आंदोलनात शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा. सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. नियमित कर्जदार शेतकरी, शेड नेट, पॉली हाऊस शेतकरी, कुक्कुट पालन शेतकरी यांच्यासह सर्व पीक व शेती सुधारणा कर्ज माफ करा या मागण्या यावेळी करण्यात आल्या. आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे तालुका अध्यक्ष कॉ. दिलीप महल्ले, तालुका सचिव अशोक केसरखाने, तालुका उपाध्यक्ष विजय पाटील यांनी केले. यावेळी प्रकाश उडबगले ,शत्रुघ्न मगर, तुळशीराम जेठे, शाकीर भाई, प्रवीण गावनर, प्रवीण पुराण, मारुती बंड, राजूभाऊ ढोके, नारायण सोनोने, रुस्तम खा पठाण, शहेनशाह, बाबा भाई, मोहसीन शेख यांच्यासह आदी शेतकरी उपस्थित होते

## 1 ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेत जाण्यासाठी मिळणार आर्थिक मदत



**अमरावती** – केंद्र सरकारच्या आरटीई कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील दुर्गम ग्रामीण तसेच घराजवळ शाळा नसलेल्या शहरी भागातील विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत प्रवासासाठी भत्ता देण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अबाधित राहणार आहे. आव्हानात्मक असलेल्या जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना या योजनेचा मोठा दिलासा मिळणार असून, यामुळे त्याची दुर्गम रस्त्यांवरील पायी चालण्याची कसरत थांबणार आहे. दुर्गम भागातील अनेक गोरगरीब मुले केवळ शाळा लांब असल्याने शिक्षणापासून वंचित राहतात किंवा अर्ध्यातून शाळा सोडतात. शासनाच्या या नव्या निर्णयामुळे आता दररोजची विद्यार्थ्याची मैलोनमैल होणारी पायपीट कायमची थांबणार आहे. वाहतुकीचे साधन उपलब्ध झाल्याने मुलांचा वेळ आणि श्रम वाचणार असून विद्यार्थ्यांना दिलासाही मिळणार आहे. केंद्र शासनाच्या आरटीई कायद्याच्या अनुषंगाने 2011 मधील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे शिक्षणाची सोय होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या वस्ती निवासस्थानापासून ठराविक किलोमीटर अंतराच्या परिसरात शाळा नाही. त्या पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी वाहतूक भत्ता दिला जाणार आहे.

## सावंगा ( विठोबा ) येथे अधिक ज्येष्ठ मास अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव,भव्य महाप्रसाद

### सेवाधारी भजनकार यांचा सत्कार व मांड वाढवा कार्यक्रम

**चांदुर रेल्वे** –अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील पवित्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे अधिक ज्येष्ठ मास अमावस्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने दि. 15 जून 2026, सोमवार रोजी सायंकाळी 5. 00 वाजता संस्थान परिसरात भक्तिमय वातावरणात चंदन उटी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानंतर बाहेरगावाहून आलेल्या भाविक भक्तांसह समस्त ग्रामस्थांसाठी संस्थानच्या अन्नदान समितीच्या नियोजनात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच, दि. 16 मे 2026 ते 15 जून 2026 या कालावधीत अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा वाढवा दि. 16 जून 2026, मंगळवार रोजी सकाळी 9 वाजता महाराजांच्या अरज व आरतीने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भजनाच्या गजरात संपन्न होणार आहे.या मांडी मध्ये दैनंदिन दिवस पाळीत निस्वार्थ भावनेने सेवा दिली अशा सेवाधारी भजनकार भाविकांचा संस्थानचे वतीने सन्मानपत्र



देवून सत्कार करण्यात येत आहे. या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त विनायक पाटील, वसंत शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी आणि संस्थान कर्मचारी यांनी केले आहे.

## दर्यापूर- खल्लार मार्गाची दयनीय अवस्था; नागरिकांचा संताप, प्रशासन कधी जागे होणार ?

**दर्यापूर**- दर्यापूर ते खल्लार हा महत्त्वाचा मार्ग सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, व्यापारी तसेच दैनंदिन प्रवासी यांना खड्डेमय रस्त्यामुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

एकीकडे देशात समृद्धी महामार्गासारखे आधुनिक आणि दर्जेदार रस्ते उभारले जात असताना ग्रामीण भागाला जोडणाऱ्या दर्यापूरङ्कखल्लार व लांडी मार्गाची मात्र अक्षरशः दुर्दशा झाली आहे. ठिकठिकाणी



पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबरीकरणाचा थर आणि अपुऱ्या दुरुस्तीमुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्याची अनेक वेळा डागडुजी करण्यात आली; मात्र ती केवळ कागदोपत्रीच ठरली. वारंवार करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे कंत्राटदारांचे हित जपले गेले, परंतु नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय झाल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे.

विशेषत रात्रीच्या वेळी वयोवृद्ध नागरिक, महिला आणि शेतकऱ्यांना या मार्गावरून प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे किरकोळ तसेच गंभीर अपघातांची मालिका सुरू असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

लोकप्रतिनिधी निवडणुकांच्या काळात जनतेच्या दारात जाऊन विकासाची आश्वासने देतात; मात्र प्रत्यक्षात मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. दर्यापूरङ्कखल्लार मार्गाचे तातडीने दर्जेदार पुनर्बांधकाम करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी आता होत आहे.या खड्डेमय रस्त्यामुळे जनतेचा संयम संपत चालला आहे. संबंधित प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला अखेर कधी जाग येणार? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

> सदर रस्ता हा संबंधित अधिकारी यांनी स्वत: डोळ्यांनी बघावा तसेच लोकप्रतिनिधींनी सुद्धा बघावा केवळ स्वत:चा स्वार्थ न बघता सामाजिक भान सुद्धा जोपासणे गरजेचे आहे निर्दयी प्रशासनाला केव्हा जाग येणार
>
> **-प्रमोद तायडे**
> नागरिक

## शरद पवारांच्या पक्षाला काँग्रेसकडून विलीनीकरणाची ऑफर?

**नवी दिल्ली** - पश्चिम बंगालच्या निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसचे बहुतांश आमदार आणि खासदार बंडखोर झाले आहेत. या आमदार-खासदारांनी स्वतंत्र गट बनवला आहे. त्यात काँग्रेसनेममता बॅनर्जी यांच्या टीएमसीला पक्षात विलीनीकरणाची ऑफर दिल्याची चर्चा होती. मात्र या चर्चा दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून फेटाळण्यात आल्या. परंतु आता काँग्रेसने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला विलीनीकरणाची ऑफर दिल्याचं समोर आले आहे. देशाच्या राजकारणात विरोधी पक्षांमध्ये सुरू असलेल्या राजकीय उलथापालथीत काँग्रेसने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला विलीनीकरणाचा प्रस्ताव दिला आहे असं सूत्रांच्या हवाल्याने सीएनएन वृत्तवाहिनीने बातमी दिली. अद्याप शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून या प्रस्तावावर भूमिका स्पष्ट करण्यात आली नाही. परंतु येणाऱ्या काळात याबाबत मोठा निर्णय होऊ शकतो. जर शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे विलीनीकरण काँग्रेसमध्ये झाले तर लोकसभेत काँग्रेस खासदारांची संख्या 8 ने वाढेल. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत पवारांच्या राष्ट्रवादीने 8 जागांवर विजय मिळवला होता. इंडिया आघाडीतून त्यांनी निवडणूक लढवली होती. या पक्षाचे प्रमुख शरद पवार सध्या राज्यसभेत खासदार आहेत. सुप्रिया सुळे, निलेश लंके, अमोल कोल्हे, अमर काळे यांच्यासह 8 लोकसभेचे खासदार आहेत. राष्ट्रीय राजकारणात काँग्रेस विचारधारेच्या पक्षांनी विलीनीकरणाचा विचार केला पाहिजे असं मत खासदार संजय राऊत यांनी मांडले होते. काँग्रेसपासून वेगळे होऊन ज्या लोकांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केला होता त्यांनी पुन्हा एकत्र यायला हवे.

## वडनेर गंगाई येथे श्री संत गजानन महाराज मंदिरात महाआरती

### मोदींच्या उत्तम आरोग्यासाठी श्रीकडे साकडे, 12 वर्षांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल मिठाई वाटप

### भाजप कार्यकर्त्यांकडून विशेष आयोजन



**दर्यापूर** - देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेतून निवडून येत सलग 4399 दिवस पंतप्रधानपद भूषवून नवा विक्रम प्रस्थापित केला असून त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या यशस्वी 12 वर्षांच्या कार्यकाळानिमित्त दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथील श्री सद्गुरू धाम संत गजानन महाराज मंदिरात भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी तसेच राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली.

कार्यक्रमास भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब वानखडे प्रमुख उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर, माजी सभापती बाबाराव पाटील बरवट, मनीष कोरपे, गोपाल चंदन, मदन पाटील बायस्कार, माणिकराव मानकर, स्वप्निल गावंडे, रघुनाथ खलोकार, नकुल सोनटक्के, नितीन बढे, ओमप्रकाश शर्मा, सुधीर हुतके, प्रकाशराव सित्रे, अनिलकुमार गावंडे, संजय मावळे, गजानन सातरोटे, प्रशांत गोंडचर, सुनील भांगे, विनोद सोनटक्के, डॉ. सुशांत गावंडे, धनंजय गावंडे, प्रतिक सपकाळ, रावसाहेब सपकाळ, दिगंबर तळोकर, रामभाऊ वानखडे, संकेत डालके यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाआरतीपूर्वी उपस्थित मान्यवरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांमध्ये साधलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. गेल्या बारा वर्षांत केंद्र सरकारने राबविलेल्या जनकल्याणकारी योजना, शेतकरी हिताचे निर्णय, पायाभूत सुविधा विकास, आत्मनिर्भर भारत अभियान तसेच भारताची जागतिक स्तरावरील वाढलेली प्रतिष्ठा याबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी विकसित भारताच्या संकल्पनेला पाठिंबा दर्शवित देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी तसेच सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात महाआरती पार पडली. राष्ट्र प्रथम या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.महाआरतीनंतर उपस्थितांनी संत गजानन महाराजांच्या चरणी देशाच्या अखंड प्रगतीसाठी, सामाजिक सलोख्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निरोगी व दीर्घ आयुष्यासाठी साकडे घातले. धार्मिक श्रद्धा, राष्ट्रभक्ती आणि जनसेवेचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




# बळीराजा शेतकरी गटाची उत्तुंग भरारी

### सत्यमेव जयते फार्मर कप 2026 स्पर्धेत समृद्धीच्या शिडीची पहिली पायरी गाठली



**प्रतिनिधी /शिर्डी**

पाणी फाउंडेशन आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सत्यमेव जयते फार्मर कप 2026 या स्पर्धेत सहभागी झालेल्या बळीराजा शेतकरी गट, पिंपळनेर यांनी समृद्ध शेतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत समृद्धीच्या शिडीची पहिली पायरी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि शेतीमधील फवारणीचा खर्च कमी करण्यासाठी दशपर्णी अर्क तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

स्पर्धेतील पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करून कमी खर्चात प्रभावी कीड व्यवस्थापन साध्य करण्याच्या उद्देशाने दशपर्णी अर्क तयार करण्यात आला. विविध औषधी वनस्पतींच्या पानांपासून बनविण्यात येणारा हा अर्क शेतीसाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो.

यावेळी मार्गदर्शक म्हणून ⁻ मा बळवंते सर,( कृषी अधिकारी) मा गव्हळे सर , मा उबरकर सर (पाणी टीम समन्वयक ) मा शेळके सर (उमेद समन्वयक ) व गटाचे निमंत्रक वैभव गायकी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली. या उपक्रमात दत्ता मोरे, प्रवीण ढोले, निलेश ढोले, विजय इंगळे, अजय खडसे, आशिष गायकी, मनोज ढोले, दिनेश भोयर सतीश गावंडे, गुरुदास आडे, संतोष मोरे आणि कैलास राठोड या शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

उपस्थित शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून उत्पादन खर्चात बचत करण्याबरोबरच जमिनीचे आरोग्य जपण्याचा निर्धार व्यक्त केला. स्पर्धेच्या पुढील टप्प्यांमध्येही अशाच नाविन्यपूर्ण आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून गट उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सत्यमेव जयते फार्मर कप 2026 स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये सामूहिक कार्य, जलसंधारण, नैसर्गिक शेती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार होत असून, बळीराजा शेतकरी गटाने त्याची दमदार सुरुवात केल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांमुळे परिसरात नैसर्गिक आणि शाश्वत शेतीची चळवळ अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.